# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरीरोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

Ph.: 0253-2539252/258/251/6659252/258/251/258EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 – 2539222/223,
**Email**: pgexammedical@muhs.ac.in, **Website**: www.muhs.ac.in

डॉ.अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations


जा.क्र. मआविवि/एक्सपीजी-एक्स१/२४०/२०२०                    दिनांक ०४/०२/२०२०

## अधिसुचना क्र. १०/२०२०

विषयः- वैद्यकीय विद्याशाखेअंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्रवाढी तथा उपस्थितीबाबत.

संदर्भः- १. भारतीय आर्युविज्ञान परीषदेद्वारे प्रसिध्द् "Post Graduate Medical Education Regulation, 2000 (Amended May 2018)"

२. विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाचा ठराव क्र.५८/२०१९ दिनांक १७/०९/२०१९.

३. विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाचा ठराव क्र.१०९/२०१९ दिनांक १८/१२/२०१९.

वैद्यकीय विद्याशाखेअंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरीता या विद्यापीठाशी संलग्नित सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची सर्वोच्च गुणवत्ता साध्य करण्याचे दृष्टीने भारतीय आर्युविज्ञान परीषदेद्वारे प्रसिद्ध "Post Graduate Medical Education Regulation, 2000 (Amended May 2018)" अंतर्गत विद्यार्थ्यांचे उपस्थितीबाबत विहित केलेले नियम विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या सभेत सादर केले होते. विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने केलेल्या संदर्भीय ठरावानुसार विद्यार्थ्यांचे उपस्थिती तथा सत्रवाढीबाबत सर्व महाविद्यालयांनी खालील प्रमाणे कार्यपध्द्ती अवलंबावी.

१. भारतीय आर्युविज्ञान परीषदेद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या "Post Graduate Medical Education Regulation, 2000 (Amended May 2018)" नियंमानुसार तसेच विद्यापीठाच्या परीक्षामंडळाच्या ठरावांनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पुर्वी पदव्युत्तर पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक वर्षात ८०% उपस्थिती तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ नंतर प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक सत्रात (सहा महिने कालावधीपैकी) ८०% उपस्थिती असणे आवश्यक आहे.

२. विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार पदव्युत्तर पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर सहा महिने कालावधीपर्यंत त्याने शोधप्रबंधाचे शिर्षक विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे, जेणेकरुन सदर विद्यार्थी संबंधीत शिर्षकावर 2 ½ वर्ष काम करु शकेल. तथापी काही कारणांस्तव सदर विद्यार्थ्याला शिर्षक सादर करण्यास विलंब झाल्यास विद्यार्थ्याने सदर शिर्षकावर कमीत-कमी १८ महिने काम करणे आवश्यक आहे.

३. पदव्युत्तर पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शोधप्रबंध शिर्षकास महाविद्यालयाच्या इथिकल कमिटीची मान्यता मिळाल्यानंतर व शोधप्रबंधाचे शिर्षकास विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर सदर विद्यार्थ्याने त्यावर किमान १८ महिने कामकाज केले आहे किंवा नाही याबाबत संबंधीत महाविद्यालयाचे अधिष्ठाता/मार्गदर्शक यांनी खातरजमा करावी व संबंधित विद्यार्थ्याने १८ महिने काम केल्याबाबत महाविद्यालयाचे अधिष्ठातांच्या स्वाक्षरीचे पत्र विद्यापीठात जमा करावे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाद्वारे संबंधीत विद्यार्थ्यांना **Online** पद्धतीने **Dissertation** सादर करण्यास परवानगी देण्यात येईल.

पुढील पानावर

४. तथापी, विद्यार्थ्यांना Online पद्धतीने Dissertation सादर करण्याची परवानगी दिली असली तरी, भारतीय आर्युविज्ञान परीषदेच्या नियंमानुसार विद्यार्थ्यांची ८०% उपस्थिती असल्याशिवाय सदर विद्यार्थी लेखी परीक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा देण्यास पात्र होणार नाही.

५. तरी, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पुर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक वर्षात ८०% उपस्थिती तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ नंतर प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक सत्रात (सहा महिने कालावधीपैकी) ८०% उपस्थिती असल्याबाबत महाविद्यालय स्तरावर खातरजमा करुन संबंधित विद्यार्थी कोणत्या परीक्षेस बसण्यास पात्र होणार आहे याबाबत महाविद्यालयाचे अधिष्ठातांनी निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यापीठास सादर करावेत.

६. यापुढे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सत्रवाढीचे व रजा मंजुरीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करु नये. तथापी, भारतीय आर्युविज्ञान परीषदेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी महाविद्यालयीन स्तरावर करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठातांची राहील. महाविद्यालयाद्वारे सत्रवाढ केलेल्या विद्यार्थ्यांची नावे माहितीस्तव विद्यापीठास कळविण्यात यावी.

सर्व संबंधित महाविद्यालयांनी उक्त अधिसुचनेची नोंद घेवून, त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

सही/-
(डॉ. अजित पाठक)
परीक्षा नियंत्रक

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
पदव्युत्तर पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमाकरीता
म.आ.वि.वि.नाशिक यांच्याशी
संलंग्नित महाविद्यालय/परीसंस्था.